वाचले:- 1. शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-1312/प्र.क्र.510/नापु-31,दि.5.3.14 दर व मार्जीन.
2.म. अव्वर सचिव, अ.ना.पु. व प्रा.सं.विभाग, मंत्रालय मुंबई यांचे पत्र क्रं.असुका-2014/प्र.क्रं.7/नापु-22,दि.3.4.14
3.म.उपसचिव , अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मंत्रालय विस्तार, मुंबई यांचे पत्र क्रं. असुका - 2015/प्र.क्रं.39/ना.पू.22,दिनांक **19 नोव्हेंबर 2015** नुसार
4.म.जिल्हाधिकारी जळगांव यांचे आदेश क्र पुरवठा/हालचाल/राअसु/मार्च-16/निडीओ/कावी/9/40/1775,दि.30.01.16

********

क्रं.पुरवठा/हालचाल/राअसु/अंकुयो/नियतन/ईटपाल/2016/9/40/1838
जिल्हाधिकारी जळगांव यांचे कार्यालय,
दिनांक 04 /02.2016

आ दे श

राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियम 2013 अंतर्गत म.उपसचिव , अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मंत्रालय विस्तार, मुंबई यांचे पत्र क्रं.असुका-2015/प्र.क्रं.39/ना.पू.22,दिनांक **19 नोव्हेंबर 2015** अन्वये मी जिल्हाधिकारी जळगांव माहे मार्च 2016 करिता , जळगांव जिल्हयाकरीता अन्त्योदय अन्न योजनेअंतर्गत सद्यस्थितीतील सुधारित कार्डसंख्या 136977 विचारात घेवून प्रती कार्ड गहू 21 किलो प्रमाणे एकूण गहू 28760 क्विं. व तांदुळ प्रती कार्ड 14 किलो प्रमाणे एकूण तांदुळ 19170 क्विं. धान्याचे नियतन प्रती कार्ड 35 किलो प्रमाणे मंजूर करण्यात येत आहे.

म. व्यवस्थापक,भारतीय खाद्य निगम महामंडळ मनमाड यांचेकडून अन्त्योदय अन्न योजनेतील गहू 28760 क्विं. डी.ओ. क्रमांक 633 दिनांक 01.02.2016 अन्वये MSWC जळगांव गोदापातून व तांदुळ 19170 क्विं. डी.ओ.क्रं. 634 दि. 01.02.2016 नुसार CWC जळगांव गोदापातून दि. 29.02.2016 पावेतो धान्याची उचल करावयाची आहे.

स्वस्तधान्य दुकान संकलनाकडील पत्र क्रमांक पुरवठा/स्वधादु/कावि/9/39/3723/2015,दि.30.04.2015 नुसार जळगांव जिल्हयाची अन्त्योदय योजनेतील लाभार्थी कार्ड संख्या 136977 असल्याचे कळविले आहे. त्यानुसार मी जिल्हाधिकारी जळगांव या आदेशाव्दारे अन्त्योदय अन्न योजनेअंतर्गत माहे मार्च 2016 करिता प्रती कार्ड गहू 21 किलो व तांदुळ 14 किलो प्रमाणे, गहू रु. 2 प्रती किलो आणि तांदुळ रु. 3 प्रती किलो प्रमाणे स्वस्तधान्य दुकानदारामार्फत लाभार्थ्यांना वितरीत करण्यास तहसिलदार यांना खालील 100%मासिक नियतनास मंजूरी देत आहे.

| अ.क्रं. | तालुका | अत्योदय कार्डसंख्या | माहे मार्च २०१६ करिता मंजूर नियतन | |
|---|---|---|---|---|
| | | | गहू | तांदुळ |
| १ | जळगांव | १३८०५ | २८९९ | १९३२ |
| २ | जामनेर | १०४७२ | २१९९ | १४६५ |
| ३ | एरंडोल | ६०४४ | १२६९ | ८४६ |
| ४ | धरणगांव | ६९२९ | १४५५ | ९७० |
| ५ | भुसावळ | ५१४५ | १०८० | ७२० |
| ६ | बोदवड | ४०८८ | ८५९ | ५७३ |
| ७ | यावल | १०९२७ | २२९४ | १५२९ |
| ८ | रावेर | ७०२७ | १४७५ | ९८३ |
| ९ | सावदा | ३५४६ | ७४४ | ४९६ |
| १० | मुक्ताईनगर | ८०९८ | १७०१ | ११३३ |
| ११ | पाचोरा | ९८३२ | २०६३ | १३७६ |
| १२ | भडगांव | ७२५६ | १५२४ | १०१५ |
| १३ | चाळीसगांव | १७२९३ | ३६३१ | २४२१ |
| १४ | अमळनेर | ९१९८ | १९३१ | १२८७ |
| १५ | पारोळा | ७२५४ | १५२३ | १०१६ |
| १६ | चोपडा | १००६३ | २११३ | १४०८ |
| | एकूण क्विं. | १३६९७७ | २८७६० | १९१७० |

उपरोक्त नियतन मंजूरीचे आदेशानुसार, तालुक्यातील स्वस्तधान्य दुकान निहाय नियतन करतांना खालील निर्देशांचे तंतोतंत पालन सर्व तहसिलदार यांनी करावे.

1. धान्याची ट्रक आल्यानंतर त्यातील धान्य विनाविलंब गोदामात उतरवून घ्यावे.
2. गोदामात उतरविणेत आलेल्या धान्याचे नियमानुसार प्रमाणीकरण ज्या त्या दिवशीच करणेत यावे.
3. योजनानिहाय गहू/तांदुळ या धन्याच्या स्वतंत्र थप्प्या गोदामात सुटसुटीत लावणेत याव्यात .
4. मंजूर करणेत आलेल्या नियतनापेक्षा जास्त धान्य प्राप्त झाल्यास, सदरचे धान्य गोदाम व्यवस्थापकाने उतरवून घेऊ नये. असे निदर्शनास आल्यास संबंधीत गोदाम व्यवस्थापकास /किपर जबाबदार धरणेत येईल. व त्यावरील येणारा सर्व खर्च संबंधितांकडून वसुल करणेत येईल.
5. गोदामातील धान्य साठा वितरण करतांना प्रथम गोदामातील जुना साठा First in first out या पध्दतीप्रमाणे वितरीत करावा. जेणे करुन जुना धान्य साठा जास्त दिवस पडून खराब होणार नाही किंवा त्यात तुट येणार नाही.
6. वाहतूक प्रतिनिधी यांनी उपरोक्त नियतनानुसारच तालुकानिहाय समप्रमाणात धान्य पाठवावे.
7. संबंधीत तहसिलदार यांनी उपयोगीता प्रमाणपत्र नियमीतरित्या जिल्हा कार्यालयातील संबंधीत संकलनाकडेस पाठवावे. सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत **आदेश** 2001 नुसार उपयोगीता प्रमाणपत्र सादर न केल्यास व त्या अभावी पुढील महिन्यात शासनाकडून धान्य न मिळाल्यास त्याची जवाबदारी आपणावर राहिल.
8. पुरवठा तपासणी अधिकारी, जिल्हा पुरवठा अधिकारी कार्यालय, जळगांव यांना माहितीसाठी व तात्काळ कार्यवाहीसाठी
   2/-. अन्नमहामंडळाचे प्रतिनिधी व आपण असे दोघासमवेत संयुक्त तपासणी करावी. व अहवाल सादर करावा.
9. धान्याचे वितरण करते वेळी धान्याचा नमूना तपासणेत यावा. धान्य खराब नसल्याची खात्री केले नंतरच स्वस्त धान्य दुकानदार यांना धान्य वितरीत करावे.
10. वाहतूक प्रतिनिधी यांनी धान्य उचल करण्या अगोदर धान्याचा दर्जा चांगला आहे किंवा नाही याची खात्री करावी. त्यासाठी अन्नमहामंडळाचे प्रतिनिधी समवेत संयुक्तरित्या तपासणी करावी व तसा रिपोर्ट सादर करावा.
11. मंजूर नियतनानुसार धान्य सर्व तालुक्यांना त्यांचे गोदामात पाठवावे. व धान्य व्यपगत होणार नाही याची दक्षता घ्यावी.
12. तालुक्यात स्वस्तधान्य दुकानदार निहाय रजिष्टर ठेऊन सदस्य संख्या /कार्डसंख्या विचारात घेऊन तहसिलदार यांनी नियतन मंजूर करावे. व नियतनाची एक प्रत व पीडीएफ प्रत तात्काळ सादर करावी.
13. गोदामातील शिल्लक साठा विचारात घेऊन स्वस्तधान्य दुकानदार यांना परमीट वितरीत करणेत यावेत. गोदामात धान्य साठा शिल्लक नसतांना आगाऊ परमिट देण्यात येऊ नयेत.
14. एका योजनेतील धान्य दुस-या योजनेत वर्ग करावयाचे असल्यास तसा प्रस्ताव या कार्यालयात शासन निर्देशानुसार सादर करावा व मंजूरी मिळालेनंतरच धान्य वर्ग करावे. तसेच ज्या योजनेतील धान्य वर्ग करुन घेतले आहे ते धान्य ज्यावेळेस प्राप्त होईल त्यावेळेस प्राधान्याने ते धान्य त्याच योजनेत वर्ग करुन समायोजीत करणेची कार्यवाही करावी. अन्यथा संबंधीतांना जबाबदार धरणेत येईल.
15. माहे एप्रिल 2016 चे धान्याची मागणी दिनांक 25.02.2016 चे पुर्वी स्वाक्षरीनिशी सादर करण्यात यावी. मागणी प्राप्त न झाल्यास पुढील महिन्याचे नियतन मंजूर करण्यात येणार नाही, तसेच शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल.

स्वाक्षरीत/-***

**जिल्हाधिकारी जळगांव**

प्रत :- म. उप सचिव, अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग,ना.पू. 22 , मंत्रालय विस्तार मुंबई 32 यांना माहितीसाठी सविनय सादर

प्रत:- म. उप आयुक्त, (पुरवठा),नाशिक विभाग नाशिक यांना माहितीसाठी सविनय सादर.

प्रत:- म. जिल्हा सुचना विज्ञान अधिकारी, NIC, जळगांव यांना माहितीसाठी व सदरचे नियतन जिल्हयाचे संकेतस्थळावर प्रसिध्दी साठी.

प्रत:- उप विभागीय अधिकारी, जळगांव, भुसावळ,फैजपूर,एरंडोल, अमळनेर, पाचोरा, चाळीसगांव यांना माहितीसाठी

प्रत:- तहसिलदार जळगांव, जामनेर, भुसावळ, बोदवड, मुक्ताईनगर, यावल, रावेर, एरंडोल, धरणगांव, पारोळा, अमळनेर, चोपडा, पाचोरा, भडगांव, चाळीसगांव यांना माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी रवाना.

प्रत:- गोदाम व्यवस्थापक/किपर/पुरवठा हिशोब अ.का. जळगांव, जामनेर, भुसावळ, बोदवड, मुक्ताईनगर, यावल, रावेर, एरंडोल, धरणगांव, पारोळा, अमळनेर, चोपडा, पाचोरा, भडगांव, चाळीसगांव यांना माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी रवाना.

प्रत:- व्यवस्थापक, भारतीय खाद्य निगम अंतर्गत महा.राज्य वखार महामंडळ,जळगांव/अमळनेर /मे.किर्ती पब्लीशर प्रा.लि.पमूराबाद यांना माहितीसाठी

प्रत:- पुरवठा तपासणी अधिकारी, जिल्हा पुरवठा अधिकारी कार्यालय, जळगांव यांना माहितीसाठी

2/-अन्नमहामंडळाच्या गोदामातून माहे **मार्च 16** चे धान्य गहू व तांदुळ महामंडळाचे गोदामातून उचल करण्यापुर्वी शासनाच्या निर्देशानुसार अन्नमहामंडळाचे प्रतीनिधिसमवेत सयुक्तरित्या धान्याचे नमुने घेण्यात यावेत धान्याचा दर्जा तपासून तो समाधानकारक धान्य FAQ असल्याची खात्री करुनच धान्याची उचल करण्यात यावी .धान्याची उचल पूर्ण झाल्यानंतर संयुक्तरित्या तपासणीचे वेळी उपस्थित असलेल्या भारतीय अन्न महामंडळाच्या व जिल्हाधिकारी जळगांव यांचे प्रतीनिधी ची नावे व त्यांचे पद स्वाक्षरी खाली असावीत व तपासणीचा दि. आणि स्थळ इ. चा संपूर्ण तपासणीच्या रिपोर्टसह माहिती शासनास सादर करण्यात यावी. त्याशिवाय पुढील महिन्याचे नियतन शासन मंजूर करणार नसल्याचे कळविले आहे. करिता सदर तपासणीची माहिती प्राप्त करुन तात्काळ शासनास सादर करण्यात यावी.तसे संबंधीत संकलनाकडे अवगत करावे.

प्रत:- धान्य वाहतूक प्रतिनिधी जळगांव,अमळनेर ,किर्ती यांना माहितीसाठी रवाना.

2/-डी.ओ.निहाय दैनंदिन टी.पी.सह Statement II मध्ये अचूक माहिती भरुन इकडील कार्यालयात दररोज सादर करण्यात यावी. त्या अद्यापही आपण सादर करीत नाहीत त्यामुळे माहितीचा ताळमेळ घेता येत नाही.

प्रत:- मे.राज ट्रॅन्पोर्ट कं.लातूर, धान्य वाहतूक ठेकेदार यांना माहितीसाठी व धान्याची उचल **29.02.2016** पावेतो पुर्ततेत करण्यासाठी रवाना.

2/-धान्याची उचल मुदतीत करण्यात यावी.धान्य व्यपगत केल्यास व्यपगत धान्याच्या बाजारभाव किमतीच्या 10% दंड रक्कम वसूल करण्याची कार्यवाही करण्यात येईल.याची नोंद घ्यावी.तालुक्याचे गोदामात धान्य मंजूर आदेशाप्रमाणेच पोहोच करण्यात यावे.तालुक्यास धान्य पोहोचल्याची खात्री करण्यात यावी.

**जिल्हाधिकारी जळगांव**

वाचले:- 1.म.अवर सचिव,अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग,मंत्रालय विस्तार मुंबई 32, यांचे पत्र क्रं.अधापु-2013/प्र.क्रं.106/ना.पु.22,दि.30.03.13.

2.कक्ष अधिकारी,अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, ना.पु.22,मंत्रालय विस्तार मुंबई 32, यांचे पत्र क्रं.अधापु-2013/प्र.क्रं.106/ना.पु.22,दि.3.06.2013 व दि.4.6.13अन्वये.

3. म. उप सचिव, अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई 32 यांचे शासन पत्र क्रं असुका- 2015/प्र.क्रं.39/ ना.पू.22. दिनांक 19 नोव्हेंबर 2015

4. म. उप सचिव, अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई 32 यांचे शासन पत्र क्रं असुका- 2015/प्र.क्रं.39/ ना.पू.22. दिनांक 19 जानेवारी 2016 व दिनांक 30.01.2016 अन्वये

5.स्वधादु संकलन,जिल्हा पुरवठा कार्यालय यांचे पत्र क्रं.पुरवठा/स्वधादु/कावि/9/39/17469/2015, दि.23.12.2015

********

क्रं.पुरवठा/हालचाल/राअसु/प्राकुयो/मार्च-16/इंटपाल /2016/9/40/1839
जिल्हाधिकारी जळगांव यांचे कार्यालय,
दिनांक 04 /02/2016

**आ दे श**

म.उप सचिव , अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, यांचे शासन पत्र क्रमांक असुका-2015/प्र.क्र.39/ना.पु.22,मंत्रालय विस्तार मुंबई 32, दिनांक **19 नोव्हेंबर 2015** अन्वये अन्न सुरक्षा योजनेअंतर्गत, **प्राधान्य कुटूंब लाभार्थी योजनेकरिता** 2214290 या **सदस्य संख्येस अधिन** राहून जळगांव जिल्हयाकरिता माहे मार्च **2016** साठी गहू **6643.00 मे.टन** व तांदुळ **4429.00 मे.टन** नियतन मंजूर करण्यात आले होते. तथापि म.उपसचिव अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग मंत्रालय विस्तार मुंबई यांचे पत्र क्रं.असुका/2015/प्रक्र.39/नापु-22 दि. 19.01.2016 अन्वये व शासन पत्र क्रमांक असुका-2015/प्र.क्रं.39/ना.पु.22,दिनांक **30.01.2016** नुसार सुधारित नियतन गहू **5337.41** मे.टन व तांदुळ **3229.46** मे टन मंजुर केले आहे.

मे 2014 ते ऑक्टोंबर 2014 या कालावधीतील एपीएल योजनेचे वाटपाअभावी जे शिल्लक धान्य होते ते धान्य प्राधान्य कुटूंब योजनेत समायोजित करण्यात येत आहे. त्यानुसार तालुकानिहाय मागील शिल्लक धान्य एपीएल (केशरी) गहू 1305.59 व तांदुळ 1199.54 विचारात घेवून + प्राधान्य कुटूंब योजनेत सुधारित नियतन गहू 5337.41 व तांदुळ 3229.46 एवढे धान्याचे डी.ओ. काढून एकुण गहू 6643.00 मे.टन व तांदुळ 4429.00 मे.टन धान्य वितरणास मंजूरी देण्यात येत आहे.

स्वधादु संकलनाकडील पत्र क्रं.पुरवठा/स्वधादु/कावि/9/39/17469/2015 दि. 23.12.2015 अन्वये जळगांव जिल्हयाची सुधारित लाभार्थी संख्या 2214290 विचारात घेवून म. व्यवस्थापक, भारतीय खाद्य निगम महामंडळ, मनमाड यांचेकडून माहे मार्च 2016 साठी गहू डी.ओ.क्रं.630 दि.01.02.16 नुसार 4337.41 मे.टन MSWC जळगांव व डी.ओ.क्रं.631 दि.01.02.16 नुसार 1000.00 मे.टन किर्ती गोदामातून असे एकुण गहू 5337.41 मे.टन आणि तांदुळ 3229.46 मे.टन डी.ओ. क्रं. 632 दि. 01.02.16 MSWC जळगांव गोदामातुन दि.29.02.2016 पावेतो उचल करण्यासाठी प्राप्त झालेला आहे.

मी जिल्हाधिकारी जळगांव या आदेशान्वये प्रती सदस्य गहू 3 किलो व तांदुळ 2 किलो असे एकुण **5** किलो धान्य, गहू **रु. 2** प्रती किलो आणि तांदुळ **रु. 3** प्रती किलो प्रमाणे स्वस्तधान्य दुकानदारामार्फत माहे मार्च **2016** करिता धान्य वितरीत करण्यास तहसिलदार यांना मंजूरी देत आहे.

| अ.क्रं. | तालुका | प्राधान्य कुटूंब सदस्य संख्या | मे 14 ते ऑक्टो-14 मधील शिल्लक एपीएल गहू प्राधान्य कुटूंब योजनेत समायोजीत | माहे मार्च 16 करिता उर्वरित मंजूर गहू | माहे मार्च 2016 करिता एकुण मंजूर नियतन गहू | मे 14 ते ऑक्टो-14 मधील शिल्लक एपीएल तांदुळ प्रा.कु. योजनेत समायोजीत | माहे मार्च 16 करिता उर्वरित मंजूर नियतन तांदुळ | माहे मार्च 2016 करिता एकुण मंजूर नियतन तांदुळ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | गहू | | | तांदुळ | | |
| 1 | जळगांव | 307866 | 2900.00 | 6336.00 | 9236 | 2123.00 | 4034.00 | 6157 |
| 2 | जामनेर | 200029 | 1074.69 | 4926.31 | 6001 | 924.14 | 3076.86 | 4001 |
| 3 | एरंडोल | 91934 | 878.67 | 1879.33 | 2758 | 194.77 | 1644.23 | 1839 |
| 4 | धरणगांव | 94433 | 0.04 | 2832.96 | 2833 | 391.82 | 1497.18 | 1889 |
| 5 | भुसावळ | 175936 | 1822.14 | 3455.86 | 5278 | 983.24 | 2535.76 | 3519 |
| 6 | बोदवड | 50288 | 508.91 | 1000.09 | 1509 | 632.69 | 373.31 | 1006 |
| 7 | यावल | 140074 | 465.80 | 3736.20 | 4202 | 1288.26 | 1512.74 | 2801 |
| 8 | रावेर | 116294 | 0.00 | 3490.00 | 3490 | 125.63 | 2200.37 | 2326 |
| 9 | सावदा | 61607 | 599.64 | 1248.36 | 1848 | 454.69 | 777.31 | 1232 |
| 10 | मु.नगर | 91212 | 161.00 | 2575.00 | 2736 | 105.00 | 1720.00 | 1825 |
| 11 | पाचोरा | 161428 | 870.82 | 3972.18 | 4843 | 410.27 | 2818.73 | 3229 |
| 12 | भडगांव | 80889 | 83.81 | 2343.19 | 2427 | 0.00 | 1618.00 | 1618 |
| 13 | 40 गांव | 205563 | 1163.96 | 5003.04 | 6167 | 1787.87 | 2324.13 | 4112 |
| 14 | अमळनेर | 161336 | 265.90 | 4574.10 | 4840 | 997.86 | 2229.14 | 3227 |
| 15 | पारोळा | 106331 | 245.49 | 2944.51 | 3190 | 180.16 | 1946.84 | 2127 |
| 16 | चोपडा | 169070 | 2015.00 | 3057.00 | 5072 | 1396.00 | 1986.00 | 3382 |
| एकुण क्विं. | | 2214290 | 13055.87 | 53374.130 | 66430 | 11995.40 | 32294.60 | 44290 |
| एकुण मे.टन | | | 1305.59 | 5337.41 | 6643.00 | 1199.54 | 3229.46 | 4429.00 |

March 2016 /Note and order

03/02/2016

उपरोक्त नियतन मंजूरीचे आदेशानुसार, तालुक्यातील स्वस्तधान्य दुकान निहाय नियतन काढतांना खालील निर्देशांचे तंतोतंत पालन सर्व तहसिलदार यांनी करावे.

1. धान्याची ट्रक आल्यानंतर त्यातील धान्य विनाविलंब गोदामात उतरवून घ्यावे.
2. गोदामात उतरविणेत आलेल्या धान्याचे नियमानुसार प्रमाणीकरण ज्या त्या दिवशीच करणेत यावे.
3. योजानिहाय गहू/तांदुळ या धान्याच्या स्वतंत्र थप्पा गोदामात सुटसुटीत लावणेत याव्यात .
4. मंजूर करणेत आलेल्या नियतनापेक्षा जास्त धान्य प्राप्त झाल्यास, सदरचे धान्य गोदाम व्यवस्थापकाने उतरवून घेऊ नये. असे निदर्शनास आल्यास संबंधीत गोदाम व्यवस्थापकास /किपरला जबाबदार धरणेत येईल. व त्यावरील येणारा सर्व खर्च संबंधितांकडून वसुल करणेत येईल.
5. गोदामातील धान्य साठा वितरण करतांना प्रथम गोदामातील जुना साठा First in first out या पध्दतीप्रमाणे वितरीत करावा. जेणे करुन जुना धान्य साठा जास्त दिवस पडून खराब होणार नाही किंवा त्यात तुट येणारनाही.

6. वाहतूक प्रतिनिधी यांनी उपरोक्त नियतनानुसारच तालुकानिहाय समप्रमाणात धान्य पाठवावे.
7. संबंधीत तहसिलदार यांनी उपयोगीता प्रमाणपत्र नियमीतरित्या जिल्हा कार्यालयातील संबंधीत संकलनाकडेस पाठवावे. सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत आदेश 2001 नुसार उपयोगीता प्रमाणपत्र सादर न केल्यास व त्या अभावी पुढील पहिन्यात शासाकडून धान्य न मिळाल्यास त्याची जबाबदारी आपणावर राहिल.
8. धान्याचे वितरण करते वेळी धान्याचा नमुना तपासणेत यावा. धान्य खराब नसल्याची खात्री केले नंतरच स्वस्त धान्य दुकानदार यांना धान्य वितरीत करावे.
9. पुरवठा निरिक्षक ,धान्य वाहतूक प्रतिनिधी यांनी डी.ओ.नुसार धान्य उचल करण्या अगोदर धान्याचा दर्जा चांगला आहे किंवा नाही याची खात्री करावी. त्यासाठी अन्नमहामंडळाचे प्रतिनिधी समवेत संयुक्तरित्या तपासणी करावी व तसा रिपोर्ट सादर करावा.
10. तालुक्यात स्वस्तधान्य दुकानदार निहाय रजिष्टर ठेऊन सदस्य संख्या /कार्डसंख्या विचारातघेऊन तहसिलदार यांनी नियतन मंजूर करावे. नियतनाची एक प्रत व सर्व नियतनाची एक पीडीएफ तयार करुन सादर करावी.
11. गोदामातील एपीएल योजनेचे शिल्लक धान्य प्राधान्य कुटूंब योजनेत समायोजित करण्यात यावे साठा विचारात घेऊन स्वस्तधान्य दुकानदार यांना परमीटस् विरीत करणेत यावे.गोदामात धान्य साठा शिल्लक नसतांना आगाऊ परमिटस् देण्यात येऊ नयेत.
12. एका योजनेतील धान्य दुस-या योजनेत वर्ग करावयाचे असल्यास तसा प्रस्ताव या कार्यालयात शासन निर्देशानुसार सादर करावा व मंजूरी मिळालेनंतरच धान्य वर्ग करावे. तसेच ज्या योजनेतील धान्य वर्ग करुन घेतले आहे ते धान्य ज्यावेळेस प्राप्त होईल त्यावेळेस प्राधान्याने ते धान्य त्याच योजनेत वर्ग करुन समायोजीत करणेची कार्यवाही करावी. अन्यथा संबंधीतांना जबाबदार धरणेत येईल.
13. माहे एप्रिल 2016 चे धान्याची मागणी दिनांक 25.02.2016 पावेतो सादर करण्यात यावी. मागणी प्राप्त न झाल्यास पुढील महिन्याचे नियतन मंजूर करण्यात येणार नाही.

स्वाक्षरी/-***

**जिल्हाधिकारी ,जळगांव**

प्रत :- म. उप सचिव, अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग,ना.पू.22,मंत्रालय विस्तार , मुंबई 32 यांना माहितीसाठी सविनय सादर

प्रत:- म. उप आयुक्त, (पुरवठा),नाशिक विभाग नाशिक यांना माहितीसाठी सविनय सादर.

प्रत:- म. जिल्हा सुचना विज्ञान अधिकारी, NIC, जळगांव यांना माहितीसाठी व सदरचे नियतन जिल्हयाचे संकेतस्थळावर प्रसिध्दी साठी

प्रत:- उप विभागीय अधिकारी, जळगांव, भुसावळ,फैजपूर,एरंडोल, अमळनेर, पाचोरा, चाळीसगांव यांना माहितीसाठी

प्रत:- तहसिलदार जळगांव, जामनेर, भुसावळ, बोदवड, मुक्ताईनगर, यावल, रावेर, एरंडोल, धरणगांव, पारोळा, अमळनेर, चोपडा, पाचोरा, भडगांव, चाळीसगांव यांना माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी रवाना.

प्रत:- पुरवठा तपासणी अधिकारी, जिल्हा पुरवठा अधिकारी कार्यालय, जळगांव यांना माहितीसाठी

2/-अन्नमहामंडळाच्या गोदामातून माहे मार्च 16 चे धान्य गहू व तांदुळ उचल करण्यापुर्वी शासनाच्या निर्देशानुसार अन्नमहामंडळाचे प्रतीनिधिसमवेत संयुक्तरित्या धान्याचे नमुने घेण्यात यावेत धान्याचा दर्जा तपासून तो समाधानकारक असल्याची खात्री करुनच धान्याची उचल करण्यात यावी ,घेतलेले धान्याचे नमुने व लेखी रिपोर्ट या कार्यालयात सादर करण्यात यावा.खराब धान्य उचल होणार नाही याची दक्षता घ्यावी.

प्रत:- गोदाम व्यवस्थापक/किपर/पुरवठा हिशोब अ.का. जळगांव, जामनेर, भुसावळ, बोदवड, मुक्ताईनगर, यावल, रावेर, एरंडोल, धरणगांव, पारोळा, अमळनेर, चोपडा, पाचोरा, भडगांव, चाळीसगांव यांना माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी रवाना.

प्रत:- व्यवस्थापक, भारतीय खाद्य निगम अंतर्गत महा.राज्य वखार महामंडळ,जळगांव/अमळनेर /किर्ती गोदाम यांना माहितीसाठी रवाना

प्रत:- धान्य वाहतूक प्रतिनिधी जळगांव,अमळनेर, किर्ती पब्लीशर प्रा.लि.ममूराबाद यांना माहितीसाठी रवाना.

2/-डी.ओ.निहाय दैनंदिन टी.पी.सह Statement II मध्ये माहिती इकडील कार्यालयात दररोज सादर करण्यात यावी.

प्रत:- मे.राज ट्रॅन्पोर्ट कं.लातूर, धान्य वाहतूक ठेकेदार यांना माहितीसाठी व दि.29.02.2016 चे पुर्वी मुदतीत धान्याची उचल करण्यासाठी रवाना.

2/-धान्याची उचल मुदतीत करण्यात यावी.धान्य व्यपगत केल्यास व्यपगत धान्याच्या बाजारभाव किंमतीच्या 10% दंड रक्कम वसूल करण्याची कार्यवाही करण्यात येईल.याची नोंद घ्यावी.करिता धान्याची उचल मुदतीत पूर्ण करावी.



**जिल्हाधिकारी,जळगांव**